# नयनरम्य सौंदर्याचा अनुभव देणारे हवाईतील स्नॉर्कलिंग



सन २००१. मोठ्या सुनेचे पहिले बाळंतपण करण्यासाठी ह्या वर्षी मी एकटीच फेब्रुवारीमध्ये अमेरिकेला जाण्यासाठी निघाले. तसे यापूर्वी मी आणि हे म्हणजे अरुण प्रभुणे आम्ही दोनदा मुलांकडे जाऊन आलो होतो. आता यावेळी एवढ्या लांब एकटीनेच जायचे म्हणून माझा जीव वर आला होता. भारतात कधीही कुठेही एकटी अशी मी गेले नव्हते. त्यामुळे ह्यांचा जीव तर माझ्यापेक्षाही खाली-वर होत होता पण गंमत म्हणजे हा प्रवास इतका सोपा आणि छान झाला की आमचे आम्हालाच नंतर आश्चर्य वाटले. मुले न्यायला विमानतळावर आली होतीच. यथावकाश बाळंतपण झाले. नात झाली. रेवा. रेवा चार महिन्यांची झाली. आता हे अमेरिकेत यायची वेळ झाली.

हे अमेरिकेत येण्यापूर्वी ह्यांना न कळू देता उदय व सत्यव्रत या आमच्या मुलांनी आमच्यासाठी एक कार्यक्रम ठरविला. खरे म्हणजे आमच्या लग्नाला १९९७ सालीच पंचवीस वर्षे पूर्ण झाली होती. मुलं अमेरिकेत असल्यामुळे पंचवीस वर्षांचा लग्नाच्या वाढदिवसाचा मोठा कार्यक्रम आम्ही त्या वर्षी मनात असूनही करू शकलो नव्हतो. मुलांच्या मनात हे फार राहिले होते. त्यामुळे त्यांनी पुढे चार वर्षांनी मागचे सगळे उट्टे काढायचे ठरवले आणि एक अनोखी भेट आम्हाला वयाच्या पन्नासाव्या वर्षी द्यायची असे ठरविले.

लग्नाच्या पंचवीसाव्या वाढदिवसाची भेट :

ही भेट म्हणजे दुसरे तिसरे काही नसून प्रशांत महासागरातील जगप्रसिद्ध हवाई बेटांची आठ दिवसांची ट्रिप होती ! आमचे आम्हाला दोघांनाच मुलांनी हवाई बेटांच्या ट्रिपला पाठवायचे ठरवले.

हे ऐकून मला तर खरं म्हणजे खूप आनंद व्हायला हवा होता पण कुठेही जायचं म्हणजे आमचं सगळं कुटुंबच जायचं आणि आता तर मुलांना घरी ठेवून आपणच मजा करायची म्हणजे नाही म्हटलं तरी वेगळंच वाटत होतं. शेवटी हो ना करता करता मी हो म्हटले.

झाले. आता आठ दिवसांची ट्रिप. अमेरिकेतून निघाल्या पासूनचा कार्यक्रम ठरवायला लागलो. चि. उदयने आता ट्रिपचा ताबा घेतला. वेळ मिळेल तेव्हा तो कॉम्प्युटरवरून हवाई बेटांची सगळी माहिती घेऊ लागला.

हवाई बेटांचे भौगोलिक स्थान :




(नकाशात डावीकडे रशिया, जपान व ऑस्ट्रेलिया तर उजवीकडे उत्तर अमेरिका. दोन्हींच्या मध्ये प्रशांत महासागर व त्यातील हवाई बेटे.)
उजवीकडील नकाशात प्रशांत महासागरातील भौगोलिक त्रिकोणात सर्वात वरच्या टोकाला हवाई बेटे.

वास्तविक पाहता हवाई बेटे ही अमेरिका देशाचा अविभाज्य भाग आहेत. २१ ऑगस्ट १९५९ रोजी हवाईला अमेरिकेचे पन्नासावे राज्य म्हणून घोषित केले गेले. असे असूनही हवाई बेटे नक्की कुठं आहेत हे आम्ही नकाशात पाहू लागलो. खरं म्हणजे ही बेटं इतकी छोटी आहेत की ते छोटे ठिपके शोधून काढावे लागले. जपान आणि उत्तर अमेरिका या देशांमध्ये प्रशांत महासागर पसरला आहे. प्रशांत महासागराच्या साधारण मध्यात बरोबर कर्कवृत्तावर असलेली ही बेटं अमेरिकेच्या पश्चिम किना-यावरील सॅनफ्रॅन्सिस्को शहरापासून अंदाजे २४०० कि.मि.वर आहेत.

प्रशांत महासागराचा विस्तीर्ण भाग पोलिनेशियन बेटांनी व्यापलेला आहे. ही बेटे प्रशांत महासागरातील एका विस्तीर्ण अशा भौगोलिक त्रिकोणात (Polynesian triangle in Pacific Ocean) येतात. या त्रिकोणाच्या वरच्या टोकाला हवाई बेटे, खालच्या डाव्या टोकाला न्यूझीलंड आणि उजव्या टोकाला रापा न्युई किंवा पूर्वेकडील बेटे (Easter Islad) आहेत. हवाई बेटे तशी संख्येने हजारच्या वर जरी असली तरी त्यातील आठ बेटांचा पुंजका 'हवाई बेटे' म्हणून ओळखला जातो. त्यातील हवाई (Hawaii), मौई (Maui), ओहाऊ (Ohau) आणि कवई (Kawai) या चार बेटांवर जाण्याची सोय तेव्हा उपलब्ध होती म्हणून त्या बेटांवरवर आम्ही जायचे ठरवले.

या बेटांतील प्रत्येक बेट हे एका पेक्षा एक सरस आणि नयनरम्य आहे. प्रत्येक बेटाचे वैशिष्ट्यही वेगवेगळे आहे. अशा बेटांना बघायला जायची आमची तयारी सुरू झाली.

तयारीचे स्वरूप :

आमचा मोठा मुलगा उदय रोज कॉम्प्युटरवर मला वेगवेगळी बेटे दाखवून प्रत्येक बेटावर आम्ही कसे जायचे, किती राहायचे, काय पाहायचे, काय करायचे ते सांगू लागला. ह्यासाठी त्याने खूप मेहनतीने प्रत्येक दिवसाचा चार्टच तयार केला. अमेरिकेला गेल्यावर खूप खाऊन आणि काहीही काम न करून मी खूपच जाड झाले होते. आता मुलाने हवाईला जाऊन हे करा, ते करा असे म्हटल्यावर माझा मलाच विश्वास वाटेना की आपण हे सर्व करू शकू म्हणून ! तरीही शेवटी त्याने फोनवरून प्रत्येक बेटावरच्या हॉटेलचे बुकिंग करून ठेवलेच. कोणकोणत्या बेटावर आम्ही काय बघणार, कोणता साहसी खेळ खेळणार याची तपशीलवार माहिती कॉम्प्युटरवरून काढून रिझर्वेशन्सही काढून ठेवली !

ह्यात गंमतीचा भाग म्हणजे सफाईदार इंग्लिश बोलणे त्यावेळी आम्हा दोघांनाही येत नव्हते. (मला तर अजूनही येत नाही) तेव्हा भाषेचा मुख्य अडसर होताच आणि याच्या जोडीला आम्ही पूर्ण शाकाहारी असल्यामुळे तो प्रश्न तर त्याहूनही मोठा होता.

<u>हे आल्यावर तयारीला प्रात्यक्षिकांची जोड !</u> :

हे कॉलेजमध्ये प्राध्यापक असल्याने त्यांच्या कॉलेजला १ मे पासून सुट्या सुरू झाल्या. हे लगेच २ तारखेला भारतातून निघून अमेरिकेला पोहचले. हे आल्यावर मग आमची प्रात्यक्षिके सुरू झाली.

मला नेहमी साडी नेसायची सवय असल्यामुळे पंजाबी ड्रेस, स्लॅक्स, टी शर्ट असे कपडे घालून पाहून आधी घरातल्या घरात त्यांची सवय करावी लागली. तिथे थंडी असली तर परत वेगळे थंडीचे कोट घ्यावे लागले. बुटांची म्हणजे स्पोर्ट्स शूजची खरेदी झाली.

मोठी सून प्रज्ञा हिने आठ दिवस पुरतील अशा साध्या पोळ्या, पुरणपोळ्या, धपाटी, तिखटमिठाच्या पु-या केल्या. लाडू, चिवडा, शंकरपाळी, चकल्या हेही केलेच. चटण्या आणि जाम होतेच.

हे सर्व ठेवायला दोन केबिन बॅगा, या बॅगांवर अडकवून नेता येतील अशा अजून दोन बॅगा, दोन हॅवरसॅक असे एकूण सामान आमच्या बरोबर होते.

आमच्या बरोबर एक कॅमेरा आणि एक कॅमकॉर्डर मुलांनी दिला होता. फोटो काढायचे काम माझे आणि शुटिंगचे काम ह्यांचे असे ठरले. अर्थात वेळ पाहून मलाही मधून मधून शुटिंग घ्यावे लागणार होते. तेव्हा तेही शिकून घ्यावे लागले.

अशी आमची प्रात्यक्षिकांसह तयारी जवळ जवळ पूर्ण झाली पण जायची तारीख जसजशी जवळ येऊ लागली तसतसा आमच्या दोघांचाही जीव खालीवर होऊ लागला ! तरीही शेवटी मनाची व सामानाची सगळी जय्यत तयारी झाली.

<u>मौई बेटावर स्नॉर्कलिंगला पोहोचलो</u> :

१० मेला आमचा हवाईला जायचा दिवस ठरला होता व १७ मेला रात्री आम्ही सॅनफ्रॅन्सिसकोला घरी परत येणार होतो. आधी हवाईची राजधानी असलेल्या होनोलुलूला गेलो. १० मेला तेथे सर्व बघून मुक्कामाला आम्ही मौई बेटावर गेलो. आता आम्हाला स्नॉर्कलिंगची ओढ लागली होती.

स्नॉर्कलिंग म्हणजे समुद्राच्या पाण्यात मस्तक बुडवून पाण्याआतील समुद्राचे आणि समुद्रतळाचे सौंदर्य न्याहाळणे. शुक्रवारी ११ मेला मौई बेटाजवळील प्रशांत महासागरात सकाळी स्नॉर्कलिंगला जायचे होते. स्नॉर्कलिंग म्हणजे नक्की काय व कसे करायचे याची काहीशी कल्पना उदयने मला दिलेली होती. ह्यांना मात्र अजिबात काही कल्पना नव्हती.

फ्रेश मूडने सकाळी आम्ही निघालो. सकाळी ७-३० वाजता मौई बेटावरील 'लाहिना' (LAHINA) गावाहून बोटीने खोल समुद्रात जायचे होते. पाण्यात उतरायचे म्हणून दूरदृष्टीने मी सुनेचा पंजाबी ड्रेस घालूनच निघाले होते. जगभरातून आलेले सगळे उत्साही तरुण 'लाहिना'त समुद्रकिनारी जमले. 'प्रिन्स' कंपनी आम्हाला स्नॉर्कलिंगला नेणार होती. निघण्यापूर्वी आमचे छान फोटो काढले.




मग आम्ही साधारण वीस-पंचवीस लोक बोटीने निघालो. स्नॉर्कलिंग करायला. 'मोलोकिनी' (MOLOKINI) बेटाकडे. प्रसन्न मनाने. उत्सुकतेने. उतावळे होऊन. सुंदर हवा. निळी शाई ओतल्यासारखे निळे-निळेशार पाणी. अतिशय शांत समुद्र. आमचे स्वागत करणारा. त्या निळाईने वेडावून जाऊन मी म्हणाले, "अहो, बघा बघा. हा गडद निळा रंग. सत्यव्रत, आहे की नाही तुझ्या गाडीच्या रंगासारखा. निळा निळा."

अनेक ठिकाणी समुद्रपाणी पाहिले. असे निळेशार समुद्रपाणी कधी दिसले नव्हते. मग इथेच असे पाणी इतके गडद निळे का दिसते ? कारण, या 'मोलोकिनी'च्या जवळचे समुद्रपाणी अति स्वच्छ आहे. अगदी स्फटिकासारखे नितळ. जगातील स्वच्छ, नितळ व प्रदूषणशून्य समुद्रपाण्याच्या ठिकाणांपैकी हे एक ठिकाण आहे. हवाईच्या शासनाने हा भाग स्वच्छ राहावा म्हणून बरेच नियमही करून ठेवले आहेत. म्हणूनच तर जगभरातून स्नॉर्कलिंगसाठी पर्यटक मुद्दाम ठरवून इथे येत असतात. कारण स्नॉर्कलिंगचा आनंद या नितळ पाण्यामुळे अक्षरशः शंभर पटीने वाढतो. मुलांनीही म्हणूनच स्नॉर्कलिंगसाठी आम्हालाही इथेच पाठवले होते.

<u>नितांत सुंदर 'मोलोकिनी'</u> :

सागरसौंदर्याला डोळ्यात साठवीत आणि नाष्ट्याला आमच्यासाठी केलेल्या खास व्हेजिटेरियन कुकीज खात खात आमचा बोटप्रवास मजेत चालला होता. साधारण पंधरा-वीस मिनिटांनी आम्हाला दूरवर एका डोंगराचे टोक दिसू लागले. तो डोंगर अगदी चंद्रकोरीसारखा होता. चहूबाजूंनी अथांग पसरलेला निळा प्रशांत महासागर आणि मध्यात हा चंद्रकोरीसारखा डोंगर. जणू निळ्या अथांग आकाशातली पिटुकली द्वितियेची सुंदर चंद्रकोरच ! सुंदर दृश्य होते. आम्हाला याच छोट्याशा वाटणा -या डोंगराजवळ स्नॉर्कलिंगसाठी जायचे होते. कारण या चंद्रकोरीसारख्या छोट्या डोंगराचे मुख म्हणजे मुळात एका मोठ्या मृत ज्वालामुखीचे मुख होते. हाच तो प्रसिद्ध 'मोलोकिनी.' या मोलोकिनी बेटाचे एक वैशिष्ट्य असे की अन्य बेटांना असतो तसा समुद्रकिनारा किंवा तशी पुळण या बेटाला नाही. स्नॉर्कलिंगसाठी ही जागा फारच लोकप्रिय आहे; कारण ही जागा कुठल्याही देशापासून खूप लांब आहे, मौई बेटापासूनही लांब आहे, पाणी अति नितळ आहे, प्रदूषणमुक्त आहे. म्हणून इथे आनंदात, शांतपणे व उत्साहाने भरून जाऊन स्नॉर्कलिंग करता येते. एकूण हा भाग पूर्ण निळ्या निळ्या अथांग पाण्याने व्यापलेला आहे आणि चंद्रकोरीसारखे असणारे मोलोकिनी ज्वालामुखीचे मुख त्यात अतिशयच खुलून दिसते.



मोलोकिनीबाबतच्या प्रसिद्ध दंतकथा :

मोलोकिनी या ज्वालामुखीबद्दल काही दंतकथाही (legend) सांगितल्या जातात. त्या अशा:

मोलोकिनी हे बेट पूर्वी फार सुंदर स्त्रीरूपात होते. ही स्त्री आणि 'पेले'(Pele) नावाची अग्निदेवता या दोघीही एकाच देखण्या राजकुमाराच्या प्रेमात पडल्या. मत्सरी स्वभावाच्या पेलेने मोलोकिनीला दोन भागात कापून टाकले आणि तिचे दगडात रूपांतर केले. तेव्हापासून ती स्त्री ज्वालामुखी बनली. आज दिसणारा मोलोकिनी म्हणजे मूळची ती सुंदर स्त्री होय.

दुसरी दंतकथा अशी: शक्तिमान अग्निदेवता 'पेले' एका देखण्या राजकुमाराच्या प्रेमात पडते. असे म्हणतात की त्या काळी हा मोलोकिनी म्हणजे एक छोटासा सुंदर सरडा होता. त्या सरड्याची नजरही याच देखण्या राजकुमारावर होती. हे लक्षात आल्यावर त्या रागिट पेलेने सरड्याचे दोन तुकडे केले. मौईच्या प्रसिद्ध 'मॅकेना बीच'(Makena Beach) जवळ अर्धवट जळालेल्या कोळशाप्रमाणे दिसणारी शंक्वाकृती टेकडी ही त्या सरड्याचे डोके आहे आणि त्याची अर्ध वर्तुळाकार शेपटी म्हणजे सध्याचा चंद्रकारी प्रमाणे भासणारा मोलोकिनी आहे असे ही दंतकथा सांगते.

भू-विज्ञानाच्या दृष्टीने हजारो वर्षांपूर्वी पाण्यामध्ये झालेल्या अनेक ज्वालामुखींच्या स्फोटांमुळे हा ज्वालामुखींचा परिसर तयार झाला. अशा प्रकारच्या शेकडो ज्वालामुखींची मुखं मौई बेटाभोवती आहेत ती पाण्याखाली; पण या शेकडो ज्वालामुखींमध्ये पाण्यावर असणारे एकमेव मुख मोलोकिनी ज्वालामुखीचे. म्हणून मोलोकिनी खरोखरच अद्वितीय, विलक्षण व एकमेव आहे.

पाण्यात उतरण्याची तयारी :

'मोलोकिनी'बेट जसजसे जवळ येऊ लागले तसे पुढच्या तयारीला सगळे लागले. स्नॉर्कलिंगसाठी मी आपला सर्वांग झाकणारा पंजाबी ड्रेस घालूनच आले होते. हा सुती ड्रेस पाण्याने जड होतो म्हणून चालणार नाही असे मला सांगितले गेले. मी घाबरले. आता काय करावे ? कोणते कपडे घालवेत ? आता ऐनवळी असे कपडे कुठे मिळणार ? आजूबाजूला बघितले तर बाकी सगळे प्रवासी खास ड्रेस घालू लागले होते. बोटीवरच असे ड्रेस ठेवले असल्याचे कळले. मग शांत वाटले. तो ड्रेस कमालीचा अखुड होता. असा इतका अपरा, इतका अखुड ड्रेस कसा काय घालायचा ! आजवर असा कोणताच ड्रेस कधी घातला नव्हता. साडी एके साडी. – पण दुसरा काही पर्याय नव्हता.

हा अपरा व तंग ड्रेस म्हणजे डायव्हिंग सूट.(diving suit) थंड पाण्यापासून उत्तम संरक्षण मिळण्यासाठी तो वापरतात. शरीराला घट्ट बसत असल्याने आत पाणी शिरून ड्रेस जड होत नाही व त्यामुळे वजनही वाढत नाही. त्यामुळे हा सूट घालूनच स्नॉर्कलिंगसाठी पाण्यात उतरणे सक्तीचे असते.

जाड माणसांना हा सूट घालायला म्हणूनच थोडे त्रासदायक होते. मी थोडी जाड असल्याने घामाघूम होत कसावसा तो सूट ह्यांच्या मदतीने एकदाचा अंगावर चढवला !

डोळ्यांच्या संरक्षणासाठी व पाण्यात स्पष्ट दिसण्यासाठी मोठ्ठा चष्मा म्हणजे डायव्हिंग मास्क (diving mask) घालावा लागतो. म्हणून तो घातला. या मास्कचा पाण्यात खूप उपयोग असतो. नुसत्या डोळ्यांनी पाण्यात पाहायचे तर फोकसिंग प्रॉब्लेम येतो. डोळ्यांत आणि मास्कमध्ये थोडी मोकळी जागा असल्यामुळे पाण्यात गेल्यावर दृष्टी कशावरही व्यवस्थित फोकस होऊ शकते.

या मास्कलाच इंग्रजी अक्षर 'J' च्या आकाराची बारा इंच लांबीची एक नळी जोडलेली असते. या नळीला स्नॉर्कल (snorkel) असे म्हणतात. या स्नॉर्कलचे एक तोंड पाण्याच्या थोडे वर असते आणि दुसरे तोंड स्नॉर्कलिंग करणा-याच्या तोंडात असते. स्नॉर्कलिंग करताना पाण्यात मस्तक बुडवल्यावर या नळीच्या साह्याने तोंडानेच श्वास घ्यावा लागत असतो.

अंगावर डायव्हिंग सूट आणि डोळ्यांवर डायव्हिंग मास्क चढवण्याचा जामानिमा करावा लागल्यानंतर बदकाच्या पंजांसारखे असलेले बूट पायात घालावे लागतात. बदकाच्या पंजाची हाडं पातळ कातडीनं जशी जोडलेली असतात तसेच हे बूट असतात. या बुटांना स्विमफिन् (swimfin) म्हणतात. हे स्विमफिन् घालून चालता येत नाही. पाण्यात उतरल्यावर मात्र पाणी ढकलायला या स्विमफिन्चा चांगला उपयोग होत असतो.

<u>पोहता येत नसताना महासागरात उडी मारली !</u> :

अशी आमची पाण्यात उतरण्याची सगळी जय्यत तयारी झाली. आता पुढची स्टेज म्हणजे महासागरात उडी मारणे ! बोटीवर आम्ही दोघेच भारतीय होतो आणि आम्हा दोघांनाही पोहता येत नव्हते ! आम्हाला (सर्वांनाच) महासागरात उडी मारायची सूचना दिली जात होती. आम्ही एकमेकांकडे बघत होतो. मुलांनी हे काय अन् कशासाठी ठरवलं असं मनात म्हणत होतो आणि त्याचवेळी यातनं आता सुटका नाही असे समजून महासागरात उडी मारण्यासाठी मनाची तयारीही करीत होतो.

आम्हाला पोहता येत नाही हे मुलांनी या कंपनीला कळवल्याने आम्हाला महासागरात फिरवून पाण्याखालील सौंदर्य दाखवायला कंपनीने आमच्यासाठी खास मार्गदर्शक बाई दिली होती. हे कळल्यावर मग मुलांच्या हुशारीचे लगेच आम्ही तोंड भरून कौतुक करीत होतो. आम्ही बोटीवर होतो. समुद्रापासून साधारण पंधरा फूट उंच; तर आमच्यासाठी ठरवलेली ती बाई खाली समुद्रात होती आणि तिथून आम्हाला समुद्रात उडी टाकण्याची सूचना करीत होती !

आमच्यासाठी तिने साधारण सात-आठ फूट लांबीची व एक-दीड इंच जाडीची एक सुबक लाकडी फळी पाण्यात तयार ठेवली होती. या फळीला लार्ज व्ह्यू बोर्ड (large view board) असे म्हणतात. समुद्रात उडी मारल्यावर या लार्ज व्ह्यू बोर्डला आम्ही दोघांनी घट्ट पकडायचे. त्यावर पालथे पडून तरंगायचे. मस्तक पाण्यात पूर्ण बुडवायचे. पाण्यावर असणा-या स्नॉर्कलने तोंडातून हवा घ्यायची आणि पाण्याखालील महासागरीय सौंदर्य निरखायचे. यासाठी लार्ज व्ह्यू बोर्डवर तरंगणा-या आम्हा दोघांना ओढत ओढत ती मार्गदर्शक बाई महासागरात लांबवर हिंडवून आणणार होती. अशी सगळी योजना होती.



शाळेत असताना हाय जंप, लाँग जंपमध्ये मी भाग घेतला होता पण हा प्रकार फारच भयंकर वाटला. समोरचा आपल्याला छान मदत करील या विश्वासाने दुस-याच्या जिवावर उडी मारायची आणि तीही अथांग प्रशांत महासागरात ! पोहायला येत नसताना ! सर्व काही सुरक्षित आहे हे कळूनसुद्धा आम्ही दोघेही घाबरलो होतो. शेवटी मनाचा हिय्या करून ह्यांनी आधी उडी मारली ! ह्यांचे पाहून मीही मग देवाचे नाव घेत उडी मारली ! क्षणभर भोवंडले. ह्हा ! ह्हा ! करू लागले. लगेच लार्ज व्ह्यू बोर्डला धरून तरंगू लागले . शांत झाले. आता मात्र भीती दूर पळाली. प्रशांत महासागरात आम्ही दोघेही तरंगत आहोत याचे खूपच अप्रुप वाटले. धन्य वाटले. आनंद वाटला.

<u>अपूर्व सागरसौंदर्याने डोळे विस्फारले !</u> :

असे सगळे शांत झाल्यावर ती मार्गदर्शक बाई सूचना देऊ लागली. आम्ही तिच्या सूचना नीट ऐकून घेऊ लागलो. तिची मुख्य सूचना एकच होती. मस्तक पाण्यात घातले की तोंड उघडायचे नाही. म्हणून बोलायचे नाही. ही सूचना पाळणे मला अत्यंत अवघड होते !

सूचना संपल्या. आता स्नॉर्कलिंग सुरू. तिचे बोलणे संपले. मोठ्या उत्सुकतेने आम्ही आमची मस्तके पाण्यात बुडवली. पाहतो तो काय ! आमचा आमच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना ! इतकं अपूर्व, इतकं नयनरम्य सौंदर्य आम्ही आयुष्यात कधीच पाहिलं नव्हतं. अशा दिव्य सौंदर्याची कधी कल्पनाही केली नव्हती. स्फटिकासारख्या नितळ अथांग निळ्याशार पाण्यात शिरलेला लख्ख सूर्यप्रकाश. सूर्यप्रकाश एवढ्या खोल समुद्रतळाशी पोहोचू शकतो यावर विश्वास ठेवावाच लागला. सूर्यप्रकाशामुळे सर्वत्र फाकलेली स्वप्नाळू निळाई. त्या तलम निळाईत आम्ही गुरफटलेलो. अशा नितळ निळाईत डुंबणारे मासे. कधीही न पाहिलेले रंगीबेरंगी मासे. चमचमणारे चंदेरी मासे. सुळकन् पळणारे. सवंगड्यांचा पाठलाग करणारे. शिवाशिवी खेळणारे. सुंदर समुद्रवनस्पती. आमची नजर ठरतच नव्हती. आम्हाला जाणवणारा पाण्याचा निळा स्वर्गीय स्पर्श. या सर्वांत हरवलेले आम्ही. देहभान विसरलेले आम्ही. समुद्राने जणू त्याच्या जवळ असलेला सौंदर्याचा संपूर्ण खजिनाच आम्हाला उघडून दाखवला होता. तो पाहून डोळे तृप्त झाले. जीवन सार्थकी लागले.

आमच्या बरोबर असण्या-या बाकी सर्वांनाच चांगले पोहता येत होते. त्यांनी मारे ऐटीत महासागरात उड्या मारल्या. ते छान खोल समुद्रात गेले. स्कूबा डायव्हिंग करू लागले. समुद्रतळाशी असलेले अपूर्व सौंदर्य जवळून पिऊ लागले. खूप मजा करू लागले. हे आम्हाला दिसत होते. हे बघायला आवडतही होते. त्यांच्याकडे आम्ही अगदी आसूसून पाहू लागलो. आम्हाला त्यांचा मनापासून हेवाही वाटू लागला. आम्हाला पोहता येत नाही याचे अतिशय वाईट वाटले. पण काहीच न पाहण्यापेक्षा थोडे फार तरी आपण अपूर्व असे काही पाहू शकलो यातच आम्ही समाधान मानले.

खरं म्हणजे ह्या ट्रिपमध्ये पोहायला येणे अतिशय आवश्यक आहे तरच खोल समुद्राच्या तळाशी असलेले सौंदर्य आपण जवळून पाहू शकतो. हे सौंदर्य बघायला त्यांना समुद्रतळाशी जाताना आम्ही पाहिले आणि मुलांना व सुनांना पोहणे अगदी सक्तीचेच करायचे हेही त्या क्षणी ठरवून टाकले !

अशा रम्य सागरतळाला निरखण्यासाठी त्या बाईने आम्हाला बराच वेळ पाण्यात ओढून फिरवत नेले. अशा सौंदर्याने वेडी झालेल्या मला बोलल्या शिवाय कसे राहवेल ? "अहो, बघा बघा. किती छान ! तो बघा चंदेरी मासा." असे काही ह्यांच्याशी बोलण्यासाठी मी किंचित तोंड उघडायचा अवकाश की नाका तोंडात पाणी जाऊन लगेचच मस्तक पाण्याबाहेर काढावे लागे. त्यामुळे ती बाई मला परत आठवण करून द्यायची की बोलू नकोस. फक्त पाहा. नंतर मात्र मी शांतपणे महासागरातल्या त्या अतिशय नयनरम्य सफरीचा आनंद उपभोगू लागले आणि मनातल्या मनात मुलांना धन्यवाद देऊ लागले !



स्नॉर्कलिंगची अशी सारी मजा अनुभवून आम्ही परत आमच्या बोटीजवळ जाऊ लागलो म्हणजे ती बाई आम्हाला बोटीकडे ओढीत नेऊ लागली. तिने आम्हाला लार्ज व्ह्यू बोर्डवरून आमच्या दोघांच्या ओझ्यासकट महासागरात कसे फिरवले याचे राहून राहून आम्हाला आश्चर्य वाटत होते. वर आल्यावर आम्ही तिच्याबरोबर फोटो काढून घेतले सगळ्यांना दाखवायला की ही बाई केवढी दणकट आहे बघा म्हणून.

आता आम्ही याच प्रशांत महासागराकडे बघत होतो पण अधिक जवळीकीने. अधिक आदराने. अधिक कौतुकाने. त्याच्या उदरात दडलेले नयनरम्य स्वर्गीय सौंदर्य पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर येत होते. पुन्हा पुन्हा महासागराच्या आत शिरायला मन अधीर होत होते. पुन्हा स्नॉर्कलिंग करायला उत्सुक होत होते.

- सौ. उषा प्रभुणे
usha_prabhune@yahoo.com

Photos on the following pages.

Photo 1/7. Snorkeling in Hawaii - by Usha Prabhune : Usha & Prabhune in Diving Suit



Photo 2/7. Snorkeling in Hawaii - by Usha Prabhune : Location of Hawii in Pacific



Photo 3/7. Snorkeling in Hawaii - by Usha Prabhune : Polynesian triangle in Pacific




Photo 4/7. Snorkeling in Hawaii - by Usha Prabhune : Usha & Arun Prabhune in Maui



Photo 5/7. Snorkeling in Hawaii - by Usha Prabhune : Molokini Island in Hawaii



Photo 6/7. Snorkeling in Hawaii - by Usha Prabhune : Usha and Arun Prabhune on Larj View Board



Photo 7/7. Snorkeling in Hawaii - by Usha Prabhune : Usha and Arun Prabhune with Snorkeling Guide



© 2009 Usha Arun Prabhune